**महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन( अधिनियम** २०१२ **अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच, विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी** २०१४-१५ **या शैक्षणिक वर्षाकरीता परवानगी देण्याबाबत ....**

# महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

शासन निर्णय क्रमांकः एसएफएस-१११४/प्र.क्र.४०/एसएम- २

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक: २६ फेब्रुवारी, २०१४

<u>वाचा -</u>

1) **शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक नाहप्र-२००९ /(६६३/०९) / माशि - १, दिनांक २० जून, २०१२.**
2) **शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. अमाशा/ स्वयंअर्थ/२०१३/६०४५४/१५-क(५)/१२०१९, दिनांक २४ डिसेंबर, २०१३.**

<u>प्रस्तावना -</u>

स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे तसेच विद्यमान शाळेचा यथास्थिती, उच्च प्राथमिक किंवा माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक शाळेस दर्जावाढ करणेसाठी परवानगी देण्याकरिता तरतुदी करणे, तसेच अशी नवीन शाळा स्थापन करण्यासह, विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणे, त्याकरिता अर्ज मागविणे, व विहित पध्दतीने परवानगी देणे, यासाठी महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ (सन २०१३ चा ०१) पारित केला असून सदर अधिनियम शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून अंमलात आला आहे. तसेच, सीबीएसई, आयसीएसई, आयबी, आयजीसीएसई आणि सीआयई इत्यादी शिक्षण मंडळाच्या अभ्यासक्रमाशी संलग्नित होण्यासाठी इच्छूक **असणा-**या इंग्रजी माध्यमांच्या शाळांना कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी व नाहरकत प्रमाणपत्र देण्याकरीता दिनांक २० जून, २०१२ रोजीच्या शासन निर्णयान्वये विस्तृत कार्यपध्दती निश्चित करण्यात आलेली आहे.

स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर खाजगी नवीन शाळांना शैक्षणिक वर्ष २०१४-१५ करिता नविन शाळा मान्यता देणे, विद्यमान शाळांचा दर्जा वाढ करणे याकरिता दिनांक ०८ ऑगस्ट,२०१३ पर्यंत अर्ज मागविण्यात

आले होते. सदर प्रस्तावांची छाननी करुन पात्र प्रस्तावांवर पुढील कार्यवाही करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. सर्व बाबींचा विचार करुन शासनाने पुढील प्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय-**

१. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) अन्वये सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षाकरीता प्राप्त झालेल्या एकूण ३७०० प्रस्तावांपैकी खालीलप्रमाणे एकूण २२१७ प्रस्तावांना याद्वारे शासन मान्यता देत आहे.

| अ.क्र. | वर्गीकरण | पात्र प्रस्ताव | अपात्र प्रस्ताव | एकूण प्रस्ताव |
|---|---|---|---|---|
| **१** | नवीन शाळा मान्यतेचे प्रस्ताव | १८०४ | १३२५ | ३१२९ |
| **२** | शाळा दर्जावाढीचे प्रस्ताव | ४१३ | १५८ | ५७१ |
| **एकूण** | | २२१७ | १४८३ | **३७००** |

**१.१ नवीन शाळा परवानगी व शाळांचा दर्जावाढ** - या सोबतच्या **विवरणपत्र- अ** मध्ये दर्शविलेल्या शाळांना, शैक्षणिक वर्ष २०१४-१५ पासून, नवीन शाळा स्थापन करणे आणि विद्यमान शाळांचा दर्जावाढ करणे याकरीता याद्वारे शासन **परवानगी** देत आहे.

**१.२.अपात्र शाळा-** नवीन शाळा स्थापन करणे किंवा विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणे यासाठी अपात्र ठरलेल्या प्रस्तावांच्या तपशीलासह संबंधित जिल्ह्याच्या छाननी समितीच्या सदस्य-सचिवांकडून संबंधित अर्जदार संस्थेला वैयक्तिरित्या कळविण्यात येईल .

**२. शासन परवानगी/शाळांचा दर्जावाढ करण्याच्या अटी व शर्ती** -

२.१ प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांनी **बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ व या अंतर्गत केलेले व केले जाणारे सर्व नियमांची /तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक आहे**.

२.२ पात्र ठरलेल्या संबधित शाळांच्या व्यवस्थापनांनी **अधिनियम, २००९** मधील तरतुदींची पुर्तता करुन सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास खालीलप्रमाणे **परवानगी** देण्यात येत आहे.

**अ)** ज्या व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी किंवा दर्जावाढ करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पुर्तता आहे अशा व्यवस्थापनांनी शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासून **एक महिन्याच्या आत** प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्ह्यांच्या शिक्षणाधिकाऱ्यांकडे अर्ज करावेत.

**ब)** ज्या व्यवस्थापनास सन २०१४-१५ करिता या शासन निर्णयाद्वारे पात्र ठरविण्यात आले आहे. अशा व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन किंवा दर्जावाढ करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पूर्तता करण्यासाठी या शासन निर्णयाच्या दिनांकापासून **अठरा महिन्याच्या** आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच **रद्दबातल** ठरेल.

**क) सीबीएसई, आयसीएसई, आयबी, आयजीसीएसई आणि सीआयई** इत्यादी शिक्षण मंडळाच्या अभ्यासक्रमाशी संलग्नित होण्यासाठी इच्छुक व्यवस्थापनास / शैक्षणिक संस्थेस शासनाने पात्र ठरवून **परवानगी (Permission)** दिलेल्या संस्थांनी शासन निर्णय दि. २० जून, २०१२ मध्ये विहित केलेल्या सर्वंकष धोरणानुसार **ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C.)** मिळविण्यासाठी प्रथमत: शाळेस **मान्यता** (Recognition) घेणे आवश्यक राहील. शाळांना अशी मान्यता (Recognition) सदर शासन निर्णयातील परिच्छेद (१०) नुसार जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक)/ जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) /शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई यांचेकडून मिळाल्यानंतर मान्यता पत्रासह संस्था संबंधित मंडळाच्या **संलग्नता ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C.)** मिळविण्यासाठी शासनास अर्ज करेल. सदर अर्जाची छाननी करुन सदर संबंधित शाळा विहित निकष, अटी व शर्तीची पूर्तता करीत असल्यास शासन शाळेस मंडळ संलग्नतेसाठी **ना-हरकत (N.O.C.)** प्रमाणपत्र देईल.

२.३ सोबतच्या **विवरणपत्रातील** यादीनुसार परवानगी देण्यात आलेल्या **नवीन शाळा / दर्जावाढ** शाळांना

i) शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे व कार्यपध्दतीचे तसेच,

ii) **महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२** (सन २०१३ चा ०१) मधील सर्व तरतूदींचे पालन करणे **बंधनकारक** राहील

२.४ सदर आदेश सर्व व्यवस्थापन/संस्थांना १५ दिवसात कळविण्याची जबाबदारी संबंधित सर्व शिक्षण उपसंचालक यांची राहील.

२.५ संबंधित सक्षम अधिका-यांनी अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरच **प्रथम मान्यता** देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

२.६ संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले **माध्यम**, शाळेचे **ठिकाण** इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी **आपोआपच रद्द** समजण्यात येईल.

२.७ **यु-डायस डाटा-** या शासन निर्णयाद्वारे परवानगी देण्यात आलेल्या **नवीन शाळा / दर्जावाढ शाळा** बाबत जिल्हानिहाय U-DISE(Unified District Information System for Education) मध्ये माहिती भरताना,

"***स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा***" म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करुन क्रमांक प्राप्त करुन घेण्याबाबतची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी **राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई** यांना **नोडल अधिकारी** म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे, संस्थेने, सर्व संबंधितांच्या माहितीकरीता "**स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा/ दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा**" असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशद्वारावर लावणे आवश्यक राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४०२२८११२४०१९९२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ramchandra Ganpat Gunjal

Digitally signed by Ramchandra Ganpat Gunjal
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=School Education & Sports Dept, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Ramchandra Ganpat Gunjal
Date: 2014.03.01 11:46:12 +05'30'

**(रा.ग.गुंजाळ)**

**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. आयुक्त, शालेय शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
२. सर्व महानगर पालिकांचे आयुक्त
३. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
४. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
५. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
६. शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
७. शिक्षण संचालक, (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
८. विभागांतर्गत सर्व संचालक.
९. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक.
१०.सर्व जिल्हा परिषदांचे शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक)
११.सर्व शिक्षण निरीक्षक (पश्चिम / उत्तर / दक्षिण) बृहन्मुंबई.

| शासन निर्णय क्र. एसएफएस-1114/प्र.क्र. 40/एसएम- 2, दिनांक 26 फेब्रुवारी 2014 चे सहपत्र | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | जिल्हा | संस्थेचे नाव व पत्ता | प्रस्तावित शाळेचे नाव व ठिकाण | नवीन शाळा/ दर्जावाढ | प्रकार | माध्यम | छाननी समितीची शिफारस व त्या बाबत प्राप्त झालेल्या हरकती / सूचना / आक्षेप विचारात घेता शासनाचा अंतिम निर्णय |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 254 | पुणे | शिक्षा एज्युकेशन सोसायटी, कदमवाक वस्ती, ता.हवेली, जि.पुणे | इनोवेरा स्कूल, गट नं.251/1, कदमवाक वस्ती, पुणे सोलापूर रोड, ता.हवेली, जि.पुणे | नवीन शाळा | प्राथमिक ते उच्च माध्यमिक | इंग्रजी | पात्र |
| 255 | पुणे | श्री समर्थ शिक्षण प्रसारक मंडळ, मोई, कुरुळी, ता.खेड, जि.पुणे | श्री समर्थ इंग्लिश मिडीयम स्कूल, चिंबळी फाटा, कुरुळी, ता.खेड,जि.पुणे | नवीन शाळा | प्राथमिक | इंग्रजी | पात्र |
| 256 | पुणे | श्री स्वामी समर्थ शिक्षण प्रसारक मंडळ, राजगुरुनगर, ता.खेड, जि.पुणे | आर्याज स्कूल, चांडोली न. खेड, ता.खेड, जि.पुणे | नवीन शाळा | प्राथमिक | इंग्रजी | पात्र |
| 257 | पुणे | कै. उध्दवराव तुळशीराम जाधवर फाऊंडेशन, नऱ्हे रोड, मानाजी नगर, ता.हवेली, जि.पुणे | प्राचार्य, डॉ. सुधाकरराव जाधवर प्राथमिक विद्यालय, नऱ्हे, वडगांव बु., ता.हवेली,जि. पुणे | नवीन शाळा | प्राथमिक | इंग्रजी | पात्र |
| 258 | पुणे | शिक्षण प्रसारक मंडळी, एस.पी. कॉलेज कॅम्पस्, पुणे-30 | एस.पी.एम. पब्लिक इंग्लिश मिडीयम स्कूल, एस.पी. कॉलेज कॅम्पस्, पुणे-30 | नवीन शाळा | प्राथमिक | इंग्रजी | पात्र |
| 259 | पुणे | श्री समर्थ शिक्षण प्रसारक मंडळ, मोई, कुरुळी, ता.खेड, जि.पुणे | श्री समर्थ इंग्लिश प्राथमिक विद्यालय, चिंबळी फाटा, चिंबळी, ता.खेड,जि.पुणे | नवीन शाळा | प्राथमिक | मराठी | पात्र |
| 260 | पुणे | पोदार एज्युकेशन अँड स्पोर्टस ट्रस्ट, डॉ. आंबेडकर रोड, परळ, मुंबई | पोदार इंटरनॅशनल स्कूल, स.नं.71/2/2सी, 71/2/3ए/3बी, हडपसर, पुणे | नवीन शाळा | प्राथमिक | इंग्रजी | पात्र |
| 261 | पुणे | मॉडर्न ॲकॅडमी ऑफ हायर एज्यु. अँड रिसर्च , सरदवाडी, पो.ता.शिरुर, जि.पुणे | मगर नॅशनल हायस्कूल, सरदवाडी, पो.ता.शिरुर, जि.पुणे | नवीन शाळा | प्राथमिक | मराठी | पात्र |
| 262 | पुणे | उमाबेल एज्युकशनल फाऊंडेशन, औंध, पुणे | बॉब-प्रायमन इंटरनॅशनल स्कूल, गट नं.97/7, घर नं.765/1, चांदखेड, ता.मावळ, जि.पुणे | नवीन शाळा | प्राथमिक | इंग्रजी | पात्र |
| 263 | पुणे | सुफा एज्युकेशन सोसायटी, गुरुवार पेठ, मोमीनपुरा, पुणे | नोबल इंग्लिश स्कूल, सं.नं.38, कोंढवा खुर्द, पुणे | नवीन शाळा | प्राथमिक | इंग्रजी | पात्र |
| 264 | पुणे | साई विद्या प्रतिष्ठान, चाकण, ता.खेड, जि.पुणे | होली एंजल्स इंग्लिश मिडीयम स्कूल, भोसे, वडगांव घेनंद रोड, ता.खेड,जि.पुणे | नवीन शाळा | प्राथमिक | इंग्रजी | पात्र |

102
28/8/2018.

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर विदयमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी २०१८-१९ या शैक्षणिक वर्षाकरीता परवानगी देण्याबाबत ....

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः एसएफएस-१०१८/प्र.क्र. ९१३/एसएम- २
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: २७ ऑगस्ट, २०१८

प्रस्तावना -

शिक्षण प्रसारक मंडळी संचलित एस.पी.एम. पब्लिक स्कुल, एस.पी.कॉलेज कॅम्पस, जि.पुणे या शाळेस स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर दर्जावाढ देण्याचा प्रस्ताव शासनास सादर झाला होता. सदर प्रस्तावास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

२.१ महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) अंतर्गत शिक्षण प्रसारक मंडळी संचलित एस.पी.एम. पब्लिक स्कुल, एस.पी.कॉलेज कॅम्पस, जि.पुणे या शाळेस (प्राथमिकला जोडुन उच्च प्राथमिक ते माध्यमिक, इयत्ता ६वी ते १०वी, इंग्रजी माध्यम, सी.बी.एस.ई) सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून स्वयंअर्थसहायित तत्वावर दर्जावाढ करण्यास खालील अटी व शर्तींची पूर्तता करण्याच्या अधीन राहून शासन परवानगी देण्यात येत आहे.

२.२ अटी व शर्ती

(१) सदर संस्थेने विहीत निकषाची व मुदतीची मुदतठेव तसेच शाळा मान्यता आदेश विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे यांच्याकडे ३ महिन्याच्या आत सादर करणे आवश्यक आहे.

(२) सदर शाळेने बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील तरतुदींचा व या अंतर्गत वेळोवेळी विहित करण्यात येणा-या सर्व नियमांची /तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक आहे.

(३) शाळेच्या व्यवस्थापनाने अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता करुन सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास खालीलप्रमाणे परवानगी (इरादा पत्र) देण्यात येत आहे:-

अ) व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पुर्तता असल्यास शैक्षणिक वर्ष सुरु

झाल्यापासून एक महिन्याच्या आत प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्ह्यांच्या शिक्षणाधिकाऱ्यांकडे व्यवस्थापनाने अर्ज करावा.

ब) व्यवस्थापनास सन २०१८-१९ करिता या शासन निर्णयाद्वारे पात्र ठरविण्यात आले असल्याने शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पूर्तता करून या शासन निर्णयाच्या दिनांकापासून अठरा महिन्याच्या आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच रद्दबातल ठरेल.

क) शासन निर्णय दि. २० जून, २०१२ मध्ये विहित केलेल्या सर्वंकष धोरणानुसार सी.बी.एस.ई. मंडळाशी संलग्नतेकरिता ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C.) मिळविण्यासाठी प्रथमत: शाळेस मान्यता (Recognition) घेणे आवश्यक राहील. शाळेने अशी मान्यता (Recognition) सदर शासन निर्णयातील परिच्छेद (१०) नुसार जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक)/ जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) /शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई यांचेकडून मिळाल्यानंतर मान्यता पत्रासह संस्था संबंधित मंडळाच्या संलग्नता ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C.) मिळविण्यासाठी शासनास अर्ज करेल. सदर अर्जाची छाननी करुन सदर संबंधित शाळा विहित निकष, अटी व शर्तींची पूर्तता करीत असल्यास शासन शाळेस मंडळ संलग्नतेसाठी ना-हरकत (N.O.C.) प्रमाणपत्र देईल.

(४) परवानगी देण्यात आलेल्या शाळेस i) शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे व कार्यपध्दतीचे तसेच, ii) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) मधील सर्व तरतूदींचे पालन करणे बंधनकारक राहील.

(५) संबंधित सक्षम अधिका-यांनी अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरच प्रथम मान्यता देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

(६) संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणी शाळा सुरू करण्यासाठी परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

(७) यु-डायस डाटा:- या शासन निर्णयाद्वारे परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा / दर्जावाढ शाळा बाबत जिल्हानिहाय U-DISE(Unified District Information System for Education) मध्ये माहिती भरताना,"*स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा*" म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करुन यु-डायस क्रमांक प्राप्त करुन घेण्याबाबतची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांना नोडल अधिकारी म्हणून घोषित केले आहे. त्याचप्रमाणे, संस्थेने, सर्व संबंधितांच्या माहितीकरीता " स्वयंअर्थसहाय्यित

**तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा/ दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा"** असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशद्वारावर लावणे आवश्यक राहील.

(८) परवानगी दिलेल्या स्वयंअर्थसहाय्यित शाळेमध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची भरती शासनाच्या प्रचलित नियम व धोरणाप्रमाणे करावी.

३. सदर आदेश संबधित संस्थेस १५ दिवसात कळविण्याची जबाबदारी संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांची राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

२८.०८.२०१८

(रा.वि.कुडले)

**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
२. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई
३. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
४. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
५. विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे
६. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यिमक), जिल्हा परिषद, पुणे
७. निवडनस्ती (एसएम-२)

S.P.M. PUBLIC SCHOOL * PUNE 30 *

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत नवीन शाळा स्थापन करणे तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी २०१८-१९ या शैक्षणिक वर्षाकरीता दिलेल्या परवानगीबाबत...

**महाराष्ट्र शासन**

**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**

शासन शुद्धीपत्र क्रमांकः एसएफएस-१०२३/प्र.क्र.७०३/एसएम-२

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,

मंत्रालय, मुंबई -४०० ०३२

दिनांक: ०४ ऑक्टोबर, २०२३

वाचा :-

१. शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र. एसएफएस-१०१८/प्र.क्र.९१३/एसएम-२, दि. २७/०८/२०१८.

शासन शुद्धीपत्रक :-

सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून शिक्षण प्रसारक मंडळी संचलित एस. पी. एम. पब्लिक स्कुल, एस. पी. कॉलेज कॅम्पस, जि. पुणे या शाळेस स्वयंअर्थसहाय्यीत तत्वावर दर्जावाढ करण्यास (प्राथमिकला जोडून उच्च प्राथमिक ते माध्यमिक, इ. ६ वी ते १० वी, इंग्रजी माध्यम, सी.बी.एस.ई.) संदर्भाधीन क्र. (१) येथील शासन निर्णयान्वये परवानगी देण्यात आली आहे. सदर शासन निर्णयातील शाळेचे नाव **"एस. पी. एम. पब्लिक स्कुल"** ऐवजी **"एस. पी. एम. पब्लिक इंग्लिश मिडीयम स्कूल"** असे वाचावे.

२. संदर्भाधीन दि. २७/०८/२०१८ च्या शासन निर्णयातील सर्व अटी व शर्ती जशाच्या तशा सदर शाळेस लागू राहतील.

३. सदर आदेश संबंधित संस्थेस १५ दिवसाच्या आत कळविण्याची जबाबदारी संबंधित शिक्षण उपसंचालक यांची राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(विवेक सपकाळ)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
२. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई
३. शिक्षण संचालक, (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
४. शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
५. विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे.
६. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे.
७. निवडनस्ती (७०३/२३/एसएम-२).

**महाराष्ट्र शासन**
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय (विस्तार), दालन क्र.४४७,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-३२.
Email ID:- sm2.sesd-mh@gov.in

क्रमांक:-एसएफएस-१०२२/प्र.क्र.८५७/एसएम-२ (ई-१०७०५११) दिनांक २७ जून, २०२५

**मान्यता पत्र**

**प्रति,**
**अध्यक्ष / सचिव,**
**शिक्षण प्रसारक मंडळी, शारदा सभागृह, सदाशिव पेठ, पुणे.**

**विषय-** महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी मान्यता पत्र **शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे संचलित एस.पी.एम.पब्लिक इंग्लिश मिडियम स्कूल, नगर भूमापन क्र.२०, एस.पी.कॉलेज कॅम्पस्, सदाशिवपेठ, पुणे**

**संदर्भ-** इरादा पत्र क्रमांक एसएफएस-१०२२/प्र.क्र.८५७/एसएम-२, दिनांक १०/११/२०२२.

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत **शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे संचलित एस.पी.एम.पब्लिक इंग्लिश मिडियम स्कूल, नगर भूमापन क्र.२०, एस.पी.कॉलेज कॅम्पस्, सदाशिवपेठ, पुणे या प्राथमिक ते माध्यमिक शाळेला जोडून उच्च माध्यमिक (इ.११ वी ते इ.१२ वी, सर्व शाखा, इंग्रजी माध्यम, सी.बी.एस.ई.)** शाळेस स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर दर्जावाढ करण्याकरीता अर्ज सादर केला होता.

२. आपल्या अर्जाच्या संदर्भात, महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ आणि महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) नियम, २०२० अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ पासून **शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे संचलित एस.पी.एम.पब्लिक इंग्लिश मिडियम स्कूल, नगर भूमापन क्र.२०, एस.पी.कॉलेज कॅम्पस्, सदाशिवपेठ, पुणे या प्राथमिक ते माध्यमिक शाळेला जोडून उच्च माध्यमिक (इ.११ वी ते इ.१२ वी, सर्व शाखा, इंग्रजी माध्यम, सी.बी.एस.ई.)** शाळेस स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर दर्जावाढ करण्याकरीता, अटीं व शर्तीसह इरादा पत्र दिले होते. सदर शाळेस आता शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून पुढील अटीं व शर्तीस अधीन राहून दर्जावाढ करण्याची मान्यता देण्यात येत आहे.

**३. अटी व शर्ती:-**

१) प्रस्तावित शाळा, बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ आणि महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११ यांद्वारे निर्धारित केलेल्या सर्व मानकांची, अटींची व शर्तींची आणि या अधिनियमान्वये शासनाने दिलेल्या निदेशांची किंवा शासनाने, वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या मानकांची किंवा प्रमाणकांची किंवा अटींची आणि शर्तींची पूर्तता करील.

२) नोंदणीकृत संस्थेने किंवा न्यासाने किंवा कंपनीने, महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ याद्वारे निर्धारित केलेल्या सर्व मानकांचे, अटींचे व शर्तींचे आणि या अधिनियमान्वये शासनाने दिलेल्या निदेशांचे किंवा शासनाने, वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या मानकांचे किंवा अटींचे आणि शर्तींचे पालन करणे अनिवार्य आहे.

३) सी.बी.एस.ई. किंवा सी.आय.एस.सी.ई. किंवा सी.ए.आय.ई. किंवा आय.बी. इत्यादी मंडळाच्या संलग्नतेसाठी इच्छुक शाळा व्यवस्थापनांनी, शासनाने वेळोवेळी दिलेल्या निदेशांनुसार, शासनाकडून ना-हरकत प्रमाणपत्र घेणे अनिवार्य आहे.

४) शाळा व्यवस्थापन, शासनाने मंजूर केलेल्या शैक्षणिक वर्षाची सुरुवात करण्यापूर्वी संबंधित जिल्ह्याच्या शिक्षण अधिकाऱ्यास कळवील.

५) या अधिनियमाच्या तरतुदींअन्वये नवीन शाळेची स्थापना करण्यासाठी किंवा शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी दिलेली परवानगी, ती ज्या शैक्षणिक वर्षासाठी मंजूर केली आहे, त्याच वर्षासाठी असेल.

६) जर शाळा व्यवस्थापन, १८ महिन्यांच्या आत, शाळा सुरु करण्यास अपयशी ठरल्यास, दिलेले मान्यता पत्र रद्द होईल.

७) शाळा व्यवस्थापनास, मंजूर केलेले शिक्षणाचे माध्यम, शाळेचे ठिकाण, भविष्यात, शासनाच्या परवानगीशिवाय बदलता येणार नाही.

८) जर शाळा व्यवस्थापनाने, शासनाने मंजुरी दिलेल्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा स्थापन केली असेल तर, त्या शाळेची परवानगी रद्द होईल.

९) अशी तरतूद करण्यात आली आहे की, स्वयंअर्थसहाय्यित शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती शासनाच्या प्रचलित नियमांनुसार व विनियमांनुसार करण्यात यावी.

१०) जिल्हानिहाय माहिती भरतेवेळी, ज्या शाळेस परवानगी देण्यात आली आहे, ती शाळा, स्वतंत्र प्रवर्ग म्हणून "स्वयंअर्थसहाय्यित शाळा" अशी माहिती भरतील व यु.डी.आय.एस.इ. क्रमांक मिळवितील. यासंबंधात, राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांस, नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे.

११) शाळा व्यवस्थापन, शाळा परिसराच्या प्रवेशद्वारावर "स्वयंअर्थसहायित परवानगीप्राप्त शाळा" असा फलक लावतील.

१२) या अधिनियमाच्या कोणत्याही किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींचा भंग केल्याच्या किंवा अधिनियमान्वये दिलेल्या कोणत्याही निदेशांचे किंवा शासनाने वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या मानकांचे किंवा प्रमाणकांचे अथवा अटी व शर्तींचे अनुपालन करण्यात कसूर केल्याच्या कारणावरुन, कोणत्याही वेळी, राज्य शासन, दिलेले मान्यता पत्र रद्द करु शकेल.

१३) शासन निर्णय दि.१३ मे २०२५ अन्वये शाळेतील विद्यार्थ्यांच्या सुरक्षा व सुरक्षिततेच्या अनुषंगाने करावयाच्या उपाययोजनांसंदर्भात दिलेल्या सर्वसमावेशक सूचनांची शाळेने काटेकोर अंमलबजावणी करणे अनिवार्य राहील.

१४) शासनाद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा इतर कोणत्याही शर्ती.

PRAMOD VITHOBA KADAM

Digitally signed by PRAMOD VITHOBA KADAM
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SCHOOL EDUCATION AND SPORTS DEPARTMENT,
2.5.4.20=f82b9c0b005ed06987e1ae26683203c8f241022e0aad6b1c827af561b72f83bb,
postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=AF49010ED6A4BEE0ED963C63F1B0172A471B894A400C0988FBB3381DB913696F,
cn=PRAMOD VITHOBA KADAM
Date: 2025.06.27 17:27:18 +05'30'

**(प्रमोद कदम)**

**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत-**

१. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
३. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
४. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
५. विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे.
६. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), जि.प.पुणे.
७. निवडनस्ती (एसएम-२)(८५७/२०२२)(ई-१०७०५११)